ANNEXURE 31

जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, ठाणे यांचे कार्यालय

जिल्हाधिकारी ठाणे कार्यालयाचे आवारात, ठाणे ४०० ६०१ दुरध्वनी क्र. २५३४८०६४

क्रमांक न.भू./अपील/एस.आर. ८७६/१३/२०१३
ठाणे दिनांक - ३१ /१२/२०१३

१. श्रीनिवास वामन ओक
२. श्री प्रभाकर वामन ओक
दोघेही रा. बी विंग विकास कॉम्प्लेक्स, ठाणे (प) ता. जि ठाणे
१ व २ चे मुलमुखत्यार श्री आझम युसूफ कोहारी,
रा. १६९ कोहारी मोहल्ला बदलापूर गांव ता. अंबरनाथ जि ठाणे — अपीलदार

विरुध्द

१. श्रीमती चरुबाई हरिश्चंद्र धुमाळ
रा माणकिवली , बदलापूर (पू) ता अंबरनाथ जि ठाणे
२. उप अधिक्षक भूमि अभिलेख, अंबनाथ — जाबदार

विषय - महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम १९६६ नियम २४७ अन्वये अपिल निर्णय.

प्राथमिक :-

मौजे मानकिवली ता. अंबनाथ येथील स.नं.७ या मिळकतीमधील ०.६०.० हे.आर क्षेत्राचा स्वतंत्र उपविभाग करुण मिळणेबाबत श्रीमती चरुबाई हरिशचंद्र धुमाळ यांनी केलेल्या अर्जान्वये पोटहिस्सा मोजणी करणेत आली. स.नं.७ चे एकूण क्षेत्र ४.०३.० हे. आर असून त्यापैकी ०.६०.० हे.आर क्षेत्राचा स्वंतत्र हिस्सा करणेकामी मोजणीच्या अनुषंगाने हिस्सा फॉर्म नंबर ४ भरलेचे दिसून येते, मात्र त्यावर अर्पालदार अगर त्रयस्थ इसम हे सहधारक असूनही त्यांची स्वाक्षरी दिसत नाही. त्यामुळे सदर मोजणी नकाशा रद्द करणेकामी अपीलदार यांनी दि. १/१०/२०१३ रोजी अपील दाखल केले आहे. त्या अनुषंगाने आगावू नोटीशीने कळवून दि. २९/१०/२०१३ ते ३१/१२/२०१३ दरम्यान सुनावणी घेण्यात आली .

मौजे मानकिवली ता. अंबनाथ स.नं.७ मध्ये एकूण १२ धारकांचे ७/१२ आहेत. असे मोजणी धारीकेवरुन दिसते स.नं.७ अदयापही गोळा नंबर असल्याचे दिसते.अपीलदार यांनी फक्त श्रीमती चरुबाई हरिश्चंद्र धुमाळ यांनाच प्रतिवादी केलेले आहे. त्यामध्ये इतर ७/१२ धारकांना पक्षकार केलेले नाही. त्रयस्थ इसमांनी दि. १९/११/२०१३ रोजी पक्षकार करुन घेणेबाबत केलेल्या अर्जान्वये विकासक म्हणून त्यांना प्रतिवादी करणे आवश्यक आहे. त्याच प्रमाणे इतर ११ पानांमधील ७/१२ मध्ये समाविष्ट सहधारकांना हितसंबंधीत अगर आवश्यक पक्षकार करणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही अपीलदार यांनी केलेली असे दिसून येते.

876

सबब महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २३२ (२) अन्वये अपील अर्जात हिसंबंधीत सहधारकांना आवश्यक पक्षकार केले नसलेने, सुधारीत अपील मेमो सादर करण्याची मुभा ठेवून प्रस्तुत अपील अर्ज विनाकार्यवही निकाली ठेवणे उचित होईल या निष्कर्षाप्रत येवून मी खालील प्रमाणे आदेश देत आहे.

आदेश :-

अपीलदार यांना सुधारीत अपील मेमो सादर करण्याची मुभा ठेवून प्रस्तुत अपील महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ कलम २३२ (२) नुसार विनाकार्यवाही निकाली ठेवणेत येत आहे.

संबंधितांना आदेशाची समज देण्यात दयावी.

स्थळ - ठाणे
दिनांक - ३१/१२/२०१३

(मिलिंद चव्हाण)
जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख.
ठाणे

अर्ज क्रमांक
अर्ज फाल्गुन
नक्कल
अनामत
नक्कल
नकाशा ... पैसे ...
कागद ... पैसे ...
एकुण फी रु.

खरी नकल

प्रमुख लिपीक
जिल्हा अधिक्षक भूमि अभिलेख
ठाणे.